कलम ११

# जिल्हाधिकारी,अमरावती यांचे कार्यालय जिल्हा अमरावती

**************************************************************************

क्रमांक -प्र.अ./भु.सं./अ.का./कावी- ८२२/२०१८ दिनांकः- २५/०१/२०१८

**************************************************************************

## अधिसुचना

**(भुमीसंपादन ,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

**क्रमांक - भु.सं.प्र.क्र.३७/४७/२००७-०८ मौजा- बोराळा , ता. चांदुरबाजार**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसुचना महसुल व वन विभाग क्र संकीर्ण .११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२,दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे, असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियामाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमिन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल .

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या **अनुसुची एक** मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **"उक्त जमिन"** असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त **"सार्वजनिक प्रयोजन"** असा करण्यात आला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसुची दोन** मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भुमीसंपादनाच्या अनुषगांने प्रकरणातील नमुद सर्व्हे क्रमांकातील जमीनीच्या भुसंपादनामुळे बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत नाही. त्याची कारणे या सोबत जोडलेल्या **अनुसुचि तीन** मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसुचिमध्ये कारणे नमुद करावीत. )

आणि ज्याअर्थी, सामाजीक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या **अनुसुचि चार** मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील या सोबत जोडलेल्या **अनुसूची पाच** मध्ये दिलेला आहे. ( नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसुचिमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती हि अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल

त्या कालावधी पर्यत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे् लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

परंतु, आणखी असे की,कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडुन भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र ) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम"असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भुमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी अचलपूर** यांना पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसुचि - एक**

जमिनीचे वर्णन

**पाझर :- बोराळा तालुका:- चांदुरबाजार जिल्हा:- अमरावती**

**भु.सं.प्र.क्र.३७/४७/२००७-०८**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर / गट नंबर | अंदाजे क्षेत्र ( हे.आर ) |
|---|---|---|
| १ | ४०/१ अ | ०.२६६ |
| २ | ४१/१ | ०.११२ |
| ३ | ४१/१ अ | ०.०२६ |
| ४ | ४२/२ | ०.०७३ |
| ५ | ४२/३ | ०.१८६ |
| ६ | ४३/२ | ०.०५६ |
| ७ | ४५/१ | ०.०१० |
| ८ | ४५/१ क | ०.०१० |
| १० | ४९/३ | ०.०५५ |
| ११ | ५०/१ | ०.०४४ |
| १२ | ५१/१ | ०.०२८ |
| १३ | ५१/२ | ०.०३५ |
| १४ | ५४/३ | ०.०८० |
| १५ | ५४/२ | ०.०८१ |

| | | |
|---|---|---|
| १६ | ५५/१ अ | ०.०७३ |
| १७ | ५५/१ ब | ०.०३७ |
| १८ | ५५/२ | ०.०९५ |
| १९ | ५६ | ०.११४ |
| २० | ५७ | ०.१०३ |
| २१ | ५/१ | ०.००८ |
| २२ | ५९/१ | ०.१२० |
| | एकुण | १.६९२ |
| भुसंपादनाचे एकुण क्षेत्र | | १.६९२ |

## अनुसुची दोन

### सार्वजनीक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :- सार्वजनिक बांधकाम विभाग,अचलपूर

प्रकल्प कार्याचे वर्णन :- बोराळा ते खराळा मार्गाचे बांधकामा करिता मौजा- बोराळा

समाजाला मिळणारे लाभ :- अस्तीत्वात असलेले पांधन रस्त्याचे विस्तारीकरण बोराळा ते खराळा हे गांव शहरी विभागाला जोडले जाईल व त्या मुळे सामाजीक जनतेला लाभ होईल.

## अनुसुची तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- प्रस्तावात नमुद प्रकरणातील भुसंपादित सर्व्हेक्रमांक मधील जमिनीमध्ये कोणतीही व्यक्ती कींवा कुटुंब विस्थापीत होत नाही.

## अनुसुची चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सांराश),

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश.

भुमि संपादन,पुर्नवसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क व अधिनियम २०१३ चे कलम १० (क) व त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४अ महसुल व वन विभाग मुंबई दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसुचने अन्वये सामाजिक प्रमाण निर्धारणातुन सुट देण्यात आली आहे.

# अनुसुची पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम :- प्रस्तावात नमुद भुसंपादित सर्व्हे क्रमांक मधील जमीन प्रकल्पाकरिता संपादित करावयाची असल्यामुळे व प्रस्तावित जमिनीत पुनर्वसन व पुनर्वसाहत होत नाही म्हणून प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

(क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिल :- निरंक

टिप - उक्त जमिनीच्या आराखडयाचे भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अचलपूर यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- /०../२०१

: 21/09/18

(डॉ.व्ही.के.राठोड)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी
अचलपूर

(अभिजीत बांगर)
जिल्हाधिकारी अमरावती